**Indian Streams Research Journal**
Vol-1 Issue-8/September-2011
**ISSN: 2230-7850** Available online www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# गुलाबराव महाराज आणि त्यांचे शैक्षणिक तत्वज्ञान

अरविंद देशमुख
सहयोगी प्राध्यापक
गो.सी.टोंपे
कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
सांदूरबाजार अमरावती

अमरावतीचे श्री. गुलाबराव महाराज हे केवळ अध्यात्म, उपसाना आणि भक्ति याविषयी चिंतन करणारे, विचार मांडणारे तत्ववेत्ते नव्हते, तर त्यांना समाजाविषयीही तळमळ होती. या अनुषंगाने त्यांनी विविध क्षेत्रबाबत आपले तत्वज्ञान विशद केले आहे. विशेषत: शिक्षणाबाबत त्यांनी जे तत्वज्ञान मांडले आहे. ते आज शिक्षणाची जी दुर्दशा होऊ लागली आहे. त्या पार्श्वभूमीवर श्री गुलाबराव महाराज यांचे शैक्षणिक तत्वज्ञान महत्वपूर्ण आहे. आजच्या पिढीला जीवनात संयम राखणारे शिक्षण देणे आवश्यक आहे. त्यांना सुसंस्कार देणारे. बुध्दी व श्रध्दा यांचा उपयोग कोठे व कसा करावा हे शिकविणारे, जुने नष्ट होऊ न देता त्यात नव्याची भर घालणारे शिक्षण देणे आवश्यक आहे या दृष्टीने श्री गुलाबराव महाराज यांचे शैक्षणिक तत्वज्ञान मार्गदर्शक ठरणारे आहे.

## तत्वज्ञ आणि तत्वज्ञान

जगातील अनेक विचारवंतानी तत्वज्ञ कोणास म्हणा वे, तत्वज्ञान म्हणजे काय याबाबत विवेचन केलेले आहे.

1) सॉक्रेटिस यांच्या मते तत्वज्ञ म्हणजे सत्याचा उपासक, सत्यशोधक, दिक्कालातील, शाश्वत चिरंतन ज्ञानप्राप्तीसाठी धडपडणारा ज्ञानोपासक होय.
2) प्लेटो यांच्यामध्ये तत्वज्ञ म्हणजे जीवनाच्या एखादया विशिष्ट अंगाचे ज्ञान प्राप्त करणे नव्हे, तर मूलभूत समग्र व सर्वसमावेशक असे ज्ञान प्राप्त करणारा तो खरा तत्वज्ञ होय.

'तत्वज्ञ' कोणास म्हणा वे याचे वरील प्रमाणे जसे विवेचन केले आहे. त्याचप्रमाणे 'तत्वज्ञान' कशास म्हणावे. याचेही विवेचन करण्यांत आले आहे. भारतात तत्वज्ञानाला 'दर्शन' असे नाव आहे. 'दर्शन' शब्दाचा, जीवनाच्या रहस्याचा साक्षात्कार वा अनुभव मिळवून देणारी विदया असा अर्थ होतो. भारतात तत्वज्ञानाच्या आधारे जीवनाला वळण लावण्याचा सतत प्रयत्न झाला आहे. तत्वज्ञान म्हणजे सर्वव्यापी, सनातन सत्याचा शोध होय. एका दृष्टीने

पाहिल्यास तत्वज्ञान व शिक्षण याची उद्दीष्टे व कार्यपध्दती ही एकच आहे. शिक्षणाने मनुष्य ज्ञानसंपन्न व सद्गुणी व्हावा, त्याला उत्कृष्ट जीवनाचा लाभ व्हावा. हे उत्कृष्ठ जीवन काय हे समजावून घेण्यासाठी तत्वज्ञानाकडे वळावे लागते. तत्वज्ञानाप्रमाणेच शिक्षणशास्त्रही जीवनाचा शोध घ्यावयला , त्याचे स्वरुप समजावून घ्यावयाला शिकवित असते. तत्वज्ञानाप्रमाणेच शिक्षणानेही व्यक्ती केवळ 'पंडित' न बनता 'शहाणी' बनावी अशी अपेक्षा असते. यामुळेच शिक्षणाचे तत्वज्ञान ही तत्वज्ञानाचीच एक शाखा मानावी लागते.

## शिक्षण म्हणजे काय ?

मानवजातीला शहाणे बनविणारी शाखा म्हणूनच शिक्षणाकडे पाहिले जाते. या शिक्षण म्हणजे नेमके काय याबाबत अनेक विद्वानांनी विवेचन केलेले आहे. याबाबत स्वामी विवेकांनंद म्हणतात, "शिक्षण म्हणजे मनुष्याच्या ठिकाणी जे पूर्णत्व आधीचेच विदयमान आहे." त्याचे प्रकटीकरण होय. परंतू प्राचीन वाङःमयात 'शिक्षण' या शब्दाचा विशेष प्रमाणात वापर झलेला दिसून येत नाही. त्याऐवजी समानार्थी शब्द म्हणून 'ज्ञान' व विदया या संज्ञाचाच उपयोग अधिक केलेला दिसतो. खरे तर शिक्षण हा शब्द मूळ 'संस्कृत शिक्ष्' या धातूपासून बनला आहे. त्याची फोड 'शिक्ष + अन - शिक्षण' अशी होते. यापैकी शिक्ष म्हणजे उपदेश करणे व अन म्हणजे बदल घडवून आणणे असा होतो. तर शिक्षण हया शब्दाचा अर्थ ज्येष्ठ व श्रेष्ठ व्यक्तिने उपदेशाने कनिष्ठ व्यक्तित बदल घडवून आणणे असा होतो. शिक्षण हया शब्दाचा इंग्रजी प्रतिशब्द-- 'Education' या शब्दाचा लॅटिन भाषेनुसार अर्थ to Lead out, to draw out. म्हणजे बाहेर काढणे, प्रकट करणे असाच आहे. थोडक्यात शिक्षण म्हणजे व्यक्तिमत्वाचा सर्वांगिण विकास होय.

शिक्षण म्हणजे काय ? याबाबत गुलाबराव महाराज यांनी स्पष्ट भूमिका मांडली आहे. ते म्हणतात की, शिक्षण म्हणजे सुसंस्काराचे दान, बुध्दी आणि श्रध्देचा उपयोग कोठे व कसा करणे हे शिकणे आणि जुने नष्ट न होऊ देता त्यात नव्याची भर घालणे होय. थोडक्यात शिक्षण म्हणजे माणसाच्या सुप्तशक्तींचा प्रकटीकरणाची प्रक्रिया होय.

## शिक्षणाची उद्दीष्टे

माणसाच्या मेंदूला अडगळीची खोली बनविणे किंवा विदयार्थ्यांच्या डोक्यात नुसरी माहिती कोंबणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट नाही. तर शिक्षणाचे उद्दिष्टे काय असावे या संदर्भात अनेक विद्वानांनी विवेचन केले आहे.

### 1) स्वामी विवेकानंद :

स्वामी विवेकानंद भारतात अनेक ठिकाणी प्रवास केला होता. या प्रवासादरम्यान माणसातील माणूसकी नष्ट झल्याचे त्यांना दिसून आले होते. म्हणून या मागासलेल्या देशातील लोकांच्या अभ्युदयासाठी त्यांना 'माणूसकीचे शिक्षण देणे अत्यंत जरुरीचे आहे.' असे स्वामी विवेकानंद यांना वाटले. या अनुषंगानेच स्वामी विवेकानंद यांनी "सर्व शिक्षणाचे ध्येय माणूस निर्माण करणे हेच असले पाहिजे" असा आग्रह धरला होता.

**2) <u>श्री.श्री रविशंकर :</u>**

श्री. श्री रविशंकर यांनीही शिक्षणाचे उद्दिष्टे काय असावीत याबाबत विवेचन केले आहे. ते म्हणतात की, " माहिती- आपण नेहमी माहिती म्हणजे शिक्षण मानतो पण तो शिक्षणाचा फक्त एक पैलू आहे."

**3) <u>श्री गुलाबराव महाराज</u>**

श्री गुलाबराव महाराज यांनी शिक्षणाचे उद्दिष्टे काय असावीत. या संदर्भात मूलभूत विवेचन केले आहे. कुप्रवृत्ती, दुष्टप्रवृत्ती ज्या व्यक्तिच्या ठिकाणी आहेत. त्या व्यक्तिला सत्प्रवृत्तीने सद् विचाराने वागण्यास शिविणे हे शिक्षणाचे उद्दिष्टे असले पाहिजे.

एकूणच विदयार्थ्यांच्या बुध्दिमत्तेचे आणि प्रतिभेचे विविध पैलू हेरुन त्यांचा आविष्कार घडवून आणणे, माणसाच्या अंत:करणात परमतत्व दडलेले असते. ते परमतत्व जाणून घेणे आणि त्याचा अविष्कार करणे हेच शिक्षणाचे खरे उद्दिष्टे आहेत.

## <u>श्री गुलाबराव महाराज यांचे शिक्षणाविषयी तत्वज्ञान</u>

श्री गुलाबराव महाराज यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक अंगे ते आध्यात्माविषयी लोकांना उपासना भक्ति याचा मार्ग जसे दाखवत होते तसेच शिक्षणाविषयीही मूलभूत स्वरुपाचे चिंतन मांडत होते. यातूनच श्री गुलाबराव महाराज यांचं शिक्षणविषयी तत्वज्ञान आकाराला आले होते.

श्री गुलाबराव महाराज यांनी माणसाला माणूस म्हणून जगण्यास जे प्रवृत्त करते ते शिक्षण होय. अशी मूलभूत स्वरुपाची शिक्षणाची व्याख्या केली आहे.

मानवी जीवन हे सुसंस्कृत, सुसमृध्द, प्रगतिशील, विकासशील जीवन आहे व शिक्षण हे जीवनधारणेचे व जीवनोन्मतीचे महत्वाचे साधन आहे. शिक्षण म्हणजे बदल हे जरी खरे असले तरी तो बदल इष्ट व सुयोग्य दिशेनेच घडून किंवा घडवून आणलेला असावा. स्वामी विवेकानंद म्हणतात, "आपल्याला आवश्यकता जीवन सुसंघटित करणाऱ्या , 'माणूस' घडविणाऱ्या श्ाील बनविणाऱ्या विचारांची, तुम्ही असे फक्त पाचच विचार आत्मसात केले असतील. ते जर आपल्या जीवनात चारित्र्यात उतरविले असतील तर सारा ग्रंथसंग्रह रडून, कोकून पिऊन टाकणाऱ्या माणसापेक्षा खासच तुम्ही अधिक सुशिक्षित आहात. शिक्षणाचा

अर्थ नुसता माहितीचा संग्रह असाच  जर असता तर मग ग्रंथ संग्रहालये जगातील सर्वात मोठे साधू व ज्ञानकोश सर्वात मोठे ऋषी ठरले असते."  कोणत्याही क्षेत्रातील परिवर्तनाला आवश्यक व पूरक अशी वैचारिक पार्श्वभूमी निर्माण करण्याचे कार्य शिक्षणाचे आहे.  साहित्याप्रमाणे शिक्षणाचेही संस्कारक्षम,  दूरगामी व चिरस्थायी स्वरुपाचे असतात.  संस्कारक्षम वयातील संस्कार दृढ होतात.  म्हणून मनावरील परिस्थितीजन्य कुसंस्काराचे मालिन्य दूर करुन त्यावर सुसंस्काराचे बीजारोपण करणे.  हे श्री गुलाबराव महाराजांच्या मते शिक्षणाचे उद्दिष्ट आहे.  श्री गुलाबराव महाराज म्हणतात शिक्षण म्हणजे सुसंस्काराचे दान होय.

मानवी जीवनाचे सर्वश्रेष्ठ साध्य अखंड सुखप्राप्ती आहे.  इंद्रियजन्य सुख देणाऱ्या वस्तू एखाद्याजवळ जितक्या अधिक तितका तो अधिक सुखी  हे समीकरण चुकीचे ठरले आहे. तेंव्हा बाहय वस्तू पासून मिळणाऱ्या क्षणिक सुखाच्या मागे न लागता अंतर्मुख होऊन शाश्वत व अखंड सुखाचा अनुभव स्वत:मध्येच घेण्याचा प्रयत्न करावा.  असे भारतीय तत्वज्ञान आजवर सांगत आले आहे.  याला अनुसरुनच श्री गुलाबराव महाराज म्हणतात की,  शिकणे हे एक सुखाचे साधन आहे.

श्रध्देनेच माणूस थोर किंवा अधम व दुर्बल बनतो.  स्वामी रामकृष्ण परमहंस म्हणतात की, स्वत:ला दुर्बल समजणारा माणूस दुर्बलच बनतो.  स्वामी विवेकानंद म्हणत  "श्रध्देचा किंवा खऱ्या विश्वासाचा प्रचार हेच माझ्या जीवनाचे ध्येय आहे.  मी पुन्हा एकवार सांगू इच्छितो की, ही श्रध्दाच मानवतेचे अत्यंत शक्तिशाली अंग आहे.  म्हणूनच प्रथम श्रध्दा अंगी बाणावा. या संदर्भाला अनुसरुफन श्री गुलाबराव महाराज म्हणतात की, बुध्दी आणि श्रध्देचा उपयोग कोठे आणि कसा करावा हे शिक्षणात शिकविणे आवश्यक आहे."  सर्व प्रकारचे ज्ञान आणि विविध प्रकारची कौशल्ये आपण बुध्दीच्या सहाय्याने संपादन करतो.  मनुष्याला मिळालेल्या बुध्दीच्या देणगीमुळे तो प्राण्यामध्ये सर्वश्रेष्ठ ठरला आहे.  आपल्या बुध्दीचा उपयोग करुन त्याने खूप प्रगती केली आहे.  एकेकाळी झाडाच्या ढोलीत राहणारा माणूस आज मंगळावर,  चंद्रावर झेपावतो.  परंतू  त्याचवेळी प्रचंड भौतिक प्रगती केलेल्या मानवाची बुध्दी पळेल का ?  अशी भीती  निर्माण झालेली आहे.  या पार्श्वभूमीवर श्री गुलाबराव महाराजांनी बुध्दी आणि श्रध्देचा उपयोग करण्याविषयीचा विवेक शिक्षणाने दयावा.  असे प्रतिपादन केले आहे.  त्यातील मौलिकता अधिक आहे  हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

शिक्षणादरम्यान विद्यर्थ्यांच्या शारीरिक मानसिक व सामाजिक विकासासोबतच त्यांच्या भावनिक विकासाकडे सुध्दा लक्ष देणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांमधील दूष्ट भावना वाढीस लागून त्यांना अनिष्ट भावनांवर विजय मिळविता आला पाहिजे.  माणसाच्या स्वभावाची सुयोग्य जडण-घडण होणे श्री गुलाबराव महाराज यांना अपेक्षित होते.

आज माणसाला माणूस म्हणून जगण्यास जे प्रवृत्त करते अशा शिक्षणाची गरज आहे. साऱ्या शिक्षणाचे ध्येय माणूस निर्माण करणे असले पाहिजे.  ज्याने शील बनते,  मानसिक शक्ति वाढते,  बुध्दी चौफेर विशाल होते,  ज्यायोगे मनुष्य स्वत:च्या पायावर उभा राहू शकतो.

उपजीविकेचे साधन प्राप्त करु शकतो व जीवनातील विविध आपत्तींना समर्थपणे तोंड देऊ शकतो. स्वामी विवेकानंद म्हणतात,

" Well, you consider a man as educated if only he can pass some examination's and deliver good Lectures. The education which does not help the common mass of people to equip themselves for the struggle for life, which does not bring out strength of character, a spirit of philantroophy, and the courage of a lion- is it. Worth the name real education is that which enable one to stand on one's own. "

म्हणूनच शिक्षणातून माणूस घडविण्याचे उद्दिष्ट साकार व्हावे, असे श्री गुलाबराव महाराज यांना अभिप्रेत आहे. म्हणूनच ते म्हणतात की, माणसाला माणूस म्हणून जगण्यास जे प्रवृत्त करते ते शिक्षण.

श्री गुलाबराव महाराज विद्याग्रहणातील मनाची भूमिका विशद करतांना म्हणतात की, " मनाबाबत, ' विचारांचा अखंड वाहत असलेला प्रवाह म्हणजे मन ' असे म्हणता येईल. मनाची शुध्दी, एकाग्रती व दिशा यावर मनाची उपयुक्तता अवलंबून असते म्हणून कोणत्याही विषयाच्या अभ्यासाचे मुख्य साधन असलेले विद्यार्थ्यांचे मन हे अधिक सामर्थ्यवान कसे होईल याचा विचार शिक्षणात होणे आवश्यक आहे. " मन पूर्ण एकाग्र करण्याची कला ज्यांना अवगत आहे. ते कोणत्याही कठीण विषय सहज आत्मसात करु शकतात व दीर्घकाळ स्मरणात ठेवू शकतात. पण त्यासाठी एकचित्त होऊन केवळ तेवढा एकच विषय मनाने अभ्यासायला हवा. आज शिक्षणात मनाची एकाग्रती साध्य करण्यावर फारसा भर दिला जात नाही. माहिती गोळा करण्याकडेच अधिक कल असतो. याच अनुषंगाने श्री गुलाबराव महाराज म्हणतात की, "कोणत्याही वस्तूचे आंतरबाहय ज्ञान हे केवळ मनाद्वारेच होत असते. ज्ञान हे स्थूल रुपाने कधीच होत नाही ते सुक्ष्मरुपाने होत असते."

श्री गुलाबराव महाराज यांच्या मते, शिक्षणाचा भर हा नवीन शिकण्यावर असतो. ज्या गोष्टी आपल्याला माहित आहेत तेच जर शिकलो तर वर्तमान परिवर्तन होणार नाही. शिक्षण म्हणजे आतील शक्ती, कल्पकता आणि आतले ज्ञान प्रगट करणे. पृथ्वीच्या पोटात पाण्याचा साठा आहे पण त्यासाठी विहीर खणावी लागते. विद्यार्थ्यांच्या हृदयात मूल्यांचा खजिना आहे पण तो बाहेर कसा काढायचा याचा विचार शिक्षणात होणे अपेक्षित आहे. पुढे श्री महाराज म्हणतात की, " जी गोष्ट आपल्याला माहित आहे तीच सांगितली तर याला शिकविणे म्हणत नाही. ज्या गोष्टी माहित नसून शिकवितात त्याच गोष्टी शिक्षणात गणल्या जातात." शिक्षणाद्वारे घडून येणारे बदल हे टिकाऊ व प्रगतीच्या स्वरुपाचे असतात. वयाचाच विचार शिक्षण प्रक्रियेत केला जावा असे श्री गुलाबराव महाराज यांना अभिप्रेत आहे.

**सारांश :**

आज शिक्षणक्षेत्रतील परिस्थिती बिकट आहे. निराशाजनक आहे. परंतू श्रध्देने व चिकाटीने प्रयत्न केल्यास परिस्थितीत परिवर्तन घडवून आणता येईल व त्यासाठी श्री गुलाबराव महाराज यांचे शैक्षणिक तत्वज्ञान उपयोगी ठरले. श्री गुलाबराव महाराज यांनी प्रतिपादित केलेले शैक्षणिक तत्वज्ञान जीवनोपयोगी तत्वज्ञान आहे. ती जीवनविद्या आहे. ज्याचा जीवनात उपयोग होतो. जे जीवनात उतरविता येते तेच खरे तत्वज्ञान ही कसोटी श्री गुलाबराव महाराजांच्या शैक्षणिक सुत्रांना पूणपणे लागू पडते म्हणून श्री महाराजांच्या तत्वज्ञानातील शाश्वत, सनातन व स्थलकाल - परिस्थिती निरपेक्ष अशा सिध्दान्ताचा परिचय करुफन घेणे हिताचे ठरणार आहे. भौथ्तकवादाने झपाटलेल्या समाजाला आज संयम शिकविण्याची आवश्यकता आहे हे आधुनिक विचारवंतही म्हणू लागले आहेत. स्वार्थ, निरपेक्ष, संयमी, विनयशील व कर्तव्यदक्ष नागरिक निर्माण करणे हे शिक्षणाचे ध्येय असावे याविषयी दुमत नाही. त्याकरिता श्री गुलाबराव महाराजांचे विचार ठरविण्याची आवश्यकता कोणलाही पटावी अशीच आहे.

**संदर्भ :**


1) महानुभव व संतवाङःमय निर्मिती व्यवस्थापक ग्रंथनिर्मिती केंद्र, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
2) श्री गुलाबराव महाराजांची विचार संपदा, डॉ. कृ.मा.घटाटे प्रकाशयः प्रज्ञाचक्षु संत श्री गुलाबराव महाराज कात्सायनी शताब्दी ज्ञानयज्ञ महोत्सव समिती, माधान जि. अमरावती
3) प्रज्ञाचक्षु श्री गुलाबराव महाराज यांचे विचार वैभव, प्रकाशक भारतीय विचार मंच, नागपूर
4) श्री गुलाबराव महाराज जीवन आणि तत्वज्ञान, डॉ.शरदचंद्र कोपर्डेकर, इंद्रायणी साहित्य, पुणे
5) गीतगुलाब, श्री गुलाबराव महाराज, प्रकाशक श्री गुलाबवरा महाराज भक्तिधाम, चांदूरबाजार, जि. अमरावती
6) नित्यतीर्थ, आळंदी महिमा, श्री गुलाबराव महाराज, प्रकाशकः पंचलतिका ग्रंथ न्यास, मुंबई